रे.दि.मु.क्र.१६९/२०१९
रणजीत वि. रमेश

## अर्ज नि.१४ खालील आदेश

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश क्र.१४, नियम ५ प्रमाणे प्राथमिक मुद्दा काढणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द र.रु.२,५०,०००/— चे वसुलीकरीता दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये असे कथन केले आहे की, ‘प्रतिवादीने वादीकडून दि.०३.०६.२०१५ रोजी र.रु.२,५०,०००/— उसनवार घेतले आणि त्याकरीता प्रतिवादीने वादीचे नावे दि.०३.०६.२०१५ रोजी र.रु. १००/— चे मुद्रांकावर घेतलेली रक्कम एप्रिल २०१६ पूर्वी परत करतो असे लिहून दिले आहे.’ वादीचे कथनांवरुन वादी व प्रतिवादी यांचेतील रक्कम देण्या—घेण्याचा व्यवहार दि.०३.०६.२०१५ रोजी घडला आहे आणि रक्कम परत करण्याची अंतिम दि.३०.०४.२०१६ अशी होती. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द दि.०३.०६.२०१५ किंवा ०१.०४. २०१६ पासून तीन वर्ष संपण्यापूर्वी दाखल करणे भाग होते. परंतू वादीने प्रस्तुतचा दावा दि.०४.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास भारतीय मुदतीचा कायदा, १९६३ चे कलम १९ व २८ ची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचे कामी 'Whether plaintiff's suit is barred by Article 19 & 28 of the Limitation Act?' असा प्राथमिक मुद्दा काढणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादीने सदरील अर्जास म्हणणे दाखल केले आहे. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व चुकीचा आहे. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज देवून मे. न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. वादीने दि.०३.०६.२०१५ रोजीच्या करारपत्रावर विसंबून सदरचा दावा दाखल केला नसून दि.०३.०६.२०१५ रोजीच्या करारप्रमाणे प्रतिवादीने वादीला दिलेल्या धनादेशाधारे प्रस्तुतचा वसुलीचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास भारतीय मुदतीचा कायदा, १९६३ चे कलम १९ व २८ ची बाधा पोहचत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

४. प्रतिवादी व वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रस्तुत दाव्याचे अभिलेखाची पाहणी केली.

५. प्रस्तुतचा दावा प्रतिवादीकडून र.रु.२,५०,०००/— वसूल होवून मिळावे याकरीता दाखल केला आहे. वादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादीला जून २०१५ मध्ये र.रु.२,५०,०००/— उसनवार दिली व त्या बदल्यात प्रतिवादीने वादीस दि.०३.०६.२०१५ रोजी र.रु.१००/— मुद्रांकावर करारपत्र करुन दिले. प्रतिवादीने र.रु. २,५०,०००/— एप्रिल २०१६ चे आत देण्याचे कबूल केले होते परंतू प्रतिवादीने र.रु.२,५०,०००/— न देता त्याचे खाते असलेले द. इचलकरंजी अर्बन को—ऑप बॅक ली. शाखा— गडहिंग्लज या बॅकेचा दि.२०.११.२०१७ रोजीचा धनादेश क्र.२५७१११ हा र.रु.२,५०,०००/— चे परतफेडीकरीता वादीस दिला. परंतू सदरील धनादेश दि.०८.१२. २०१७ रोजी न वटता परत आला. त्यामुळे दि.२०.११.२०१७ रोजीचा धनादेश क्र.२५७१११ न वटता दि.०८.१२.२०१७ रोजी परत आला म्हणून धनादेशाची रक्कम रुपये २,५०,०००/— वसुलीकरीता प्रस्तुत

दावा दाखल केला आहे.

६. अशाप्रकारे प्रस्तुत दावा हा दि.०३.०६.२०१५ रोजीच्या नोटराईज करारपत्रावर अवलंबून दाखल केला नसून दि.२०.११.२०१७ रोजीच्या धनादेशाच्या रक्कम वसुलीकरीता दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दावा दि.०४.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा मुदतीत आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याचे कामी 'Whether plaintiff's suit is barred by Article 19 & 28 of the Limitation Act?' असा प्राथमिक मुद्दा काढणे गरजेचे नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे —

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर केला.

Digitally signed by Bhanupriya Ashok Durgawade
Date: 2021.03.31 16:09:17 +0530

दिनांक—३१.०३.२०२१

**(कु.बी.ए.दुर्गवडे)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. G.S.Shinge |
| Court | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Gadhinglaj |
| Date | 31-03-2021 |
| order signed by the P.O. on | 31-03-2021 |
| order uploaded on | 31-03-2021 |